ठाणे, मंगळवार दि. २ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ६५ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

अग्रलेख

**बसपाचा राष्ट्रीय दर्जा धोक्यात**

एकेकाळी उत्तर प्रदेश राज्यात सत्तेवर असणारा आणि राष्ट्रीय राजकारणातील उदयोन्मुख पक्ष म्हणून पाहिल्या गेलेल्या बसपा पक्षाची अवस्थ दयनीय झाली आहे. या लोकसभा निवडणुकीमध्ये बसपाला एकही जागा जिंकता आलेली......पान २ वर

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे



मुख्यमंत्री हरित ठाणे अभियानात एक लाख झाडे लावणार

...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com


**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७१,६०० | ८७,३९० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



महागाई वाढली म्हणून नाराज का होता? महागड्या वस्तू घेण्याची क्षमता वाढवली तर आपला देश श्रीमंत म्हणून गणला जाईल.

# यापुढे गट 'क' च्या सर्व परीक्षा MPSC घेणार

**मुंबई : राज्य सरकारच्या वतीनं गट कच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राबवली जाणार आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्याच्या कॅबिनेटनं गट कच्या जागा टप्प्या टप्प्यानं एमपीएससीकडे वर्ग करणार आहोत. यासाठी सहा ते आठ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. लोकांची मागणी होती त्याप्रमाणं हा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगानं देखील याबाबत तयारी दर्शवली आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

देवेंद्र फडणवीस यांनी नोकरभरती परीक्षांमधील गैरप्रकाराचा हा विषय गंभीर आहे, असं म्हटलं. पण घडल काय आणि नरेटीव्ह काय आहे. मागच्या सरकारच्या काळात किती फुटलं आणि काय फुटत याची जंत्री मी आणली आहे. मात्र, त्यामध्ये जाणार असं फडणवीस म्हणाले. आता परीक्षा टीसीएसच्या केंद्रावर आणि आयबीपीएसतर्फे होतील.

पेपरफुटीच्या प्रकरणात आपण कारवाई केलेली आहे. केवळ एक गुन्हा दाखल झालाय मात्र दुसरा कुठलाही गुन्हा आतापर्यंत दाखल झालेला नाही, असं देखील देवेंद्र फडणवीस म्हणाले. आतापर्यंत आपण ७५ हजार ची भरती घोषित केली होती. त्यापैकी सरकार आल्यानंतर ५७ हजार ४५२ जणांच्या नियुक्तीचे आदेश दिले आहेत, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.



### ७७ हजार लोकांना नोकरी दिली

आमच्या सरकारनं ७७ हजार ३०५ लोकांना राज्य सरकारने नोकरी दिलेली आहे. त्यात कुठलाही घोटाळा झालेला नाही. गट क च्या जागा आपण टप्पा टप्याने भरणार आहोत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. ७७ हजार पदे भरणे हा राज्याचा रेकॉर्ड आहे. यात सर्व विभाग आहेत. आपण सर्वच विभागात पदे भरली आहेत. एका सरकारच्या अडीच वर्षाच्या काळात १ लाख पेक्षा जास्त भरती केली, हा विक्रम आहे, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, पारदर्शक पद्धतीने भरती केली. राजेश टोपे यांनी उपस्थित केलेल्या एक हजार रुपयांच्या फीच्या प्रश्नावर फडणवीस यांनी फी कमी करण्याचा विचार करू असं म्हटलं. (पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

## एमपीएससी'ची 'टंकलेखन' परीक्षा तांत्रिक गोंधळामुळे रद्द; उमेदवार संतापले

नागपूर: महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३, मधील लिपिक टंकलेखक व करसहायक या संवर्गाची 'टंकलेखन कौशल्य चाचणी' परीक्षेत पहिल्याच दिवशी तांत्रिक गोंधळ उडाल्याने १ ते ३ जुलैपर्यंतची परीक्षा रद्द करण्यात आली. राज्यभरातील विद्यार्थ्यांना मुंबई हे एकच परीक्षा केंद्र दिल्याने मुंबईबाहेरून (पान २ वर)

'एमपीएससी'ने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा खेळ मांडला आहे. अन्य ठिकाणी सॉप्टवेअर नाही म्हणून मुंबईला परीक्षा घेतो असे आयोग सांगतो. राज्यभरातील विद्यार्थ्यांना आर्थिक, मानसिक त्रास देऊन मुंबईला परीक्षेसाठी बोलावले जाते. त्यानंतर पहिल्याच दिवशी गोंधळ निर्माण होतो. ही आयोगाच्या चुकांची सीमा झाली आहे. त्यामुळे सरकारने याची गंभीर दखल घेत सर्व विद्यार्थ्यांना आर्थिक नुकसान भरवाई द्यावी.

**– उमेश कोर्राम, स्टुटंट्स राईट्स असोसिएशन.**

सकाळपासून आम्ही परीक्षा केंद्रावर होतो. दुर्दैवाने काही तांत्रिक अडचणी आली आहेत. सायंकाळपर्यंत अडचण दूर होईल असे आश्वासन 'टीसीएस' कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिले. परंतु, अडचण दूर होऊन परीक्षा मार्गी लागाव्या यासाठी आम्ही खूप प्रयत्न केला. मात्र ते न झाल्याने आजची परीक्षा रद्द करण्यात आली. तसेच खबरदारी म्हणून ३ जुलैपर्यंतची परीक्षाही रद्द करण्याचा निर्णय घेतला.

**– डॉ. सुवर्णा खरात, सचिव एमपीएससी.**

**ठाणे – रोज संध्याकाळी, ट्राय डे असो किंवा गांधी जयंती असो रोज नित्यनियमाने मद्यपी आणि नशेडीची भरणाऱ्या जत्रेला पालिकेच्या अतिक्रमण निष्कासन कारवाईने ब्रेक लागला आहे. ठाणे महानगर पालिकेने मोठ्या फौजफाट्यासह हिल्स स्टेशन असलेल्या येऊर येथे कारवाईचा धडाका सुरु केला आहे. पालिका आयुक्त सौरभ राव हे कारवाईच्या वेळी येऊर येथे उपस्थितीत होते. त्यांनी येऊर मधील आदिवासी लोकांशी संवाद साधला. पालिका आयुक्तांच्या उपस्थितीमुळे चौथ्या दिवशीची तोडू कारवाई ही धडाक्यात झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.** (पान २ वर)

■ पालिका आयुक्त ॲक्शन मोडवर ...

# पुन्हा बांधकाम केल्यास कारवाई करणार

**आयुक्तांचा इशारा**

■ येऊरच्या अनधिकृत ढाबे, हॉटेल्स, बारवर पालिकेचा हातोडा



### प्रचंड फौजफाटा आणि पोलिसांचा बंदोबस्त

ठाणे महापालिकेने अतिक्रमण केलेल्या हॉटेल्स, अमली पदार्थ उपलब्ध करून देणारे बार आणि हुक्का पार्लर यांच्यावर धडक कारवाई करण्यास सुरुवात केल्याने धाबे, हॉटेल्स, बेकायदेशीर बार, ढाब्यांवर बेकायदेशीर मद्य उपलब्ध करून देणार्यांचे धाबे दणाणले आहेत. तर पालिका आयुक्तांनी कारवाईची पाहणी केल्याने अतिक्रमण विभागाच्या मनुष्यबळ दोन पोकलेन, पाच जेसीबी, पाच कटर, १०० कर्मचारी असा फौजफाटा येऊरमध्ये नेऊन पोलिसांच्या बंदोबस्तात धडक कारवाई करून लालाला बार, बॉम्बे डक, गारवा, लाईट हाऊस, सिक्रेट्स ऑफ येऊर, सफारी वूड्स, माऊंटन स्पिरिट या सात ठिकाणी धडक कारवाई करण्यात आली.



### हवाई दल आणि येऊरवासियांच्या आक्रोशाला प्रतिसाद मिळाला

अनेक वर्ष येऊरच्या आदिवासी रहिवाशी आणि येऊरच्या जंगलातील वन्यप्राण्यांनि निमूटपणे सहन केला. येऊरच्या नैसर्गिक शांततेत मद्यपींच्या रोजच्या मधुशाळे मुळे नागरिकांची निरव शांतता लोप पावलेली होती. तर येऊर येथे असलेल्या एअरफोर्स आणि स्थानिक आदिवासी नागरिकांनी अनेकवेळा तक्रारी केल्या. मात्र पालिका प्रशासनाने त्यांचा आक्रोश ऐकलाच नव्हता. किंवा तक्रारीनंतर पालिका अधिकारी दिखाऊ कारवाई करताना दिसले. मात्र सोमवारी चौथ्या दिवशी खुद्द पालिका आयुक्तांनी कारवाईची पहाणी केली. येऊरवासीयांशी संवाद साधला. त्यामुळे येऊरमधील अनधिकृत रामराज्य उद्ध्वस्त झाले. तर उर्वरित साम्राज्याच्या विटाही उध्वस्त करण्यात येणार असल्याचा इशारा आयुक्तांनी दिला.





### कारवाई नंतर बांधकाम केल्यास पुन्हा कारवाई

ठाण्याच्या येऊर परिसरात जल्लोष, धुडगूस घालण्यासाठी ठाण्यासोबतच मोठ्या प्रमाणात मुंबई, नवीमुंबई, कल्याण आदी शहरातून लोक येत होते. रात्री दहा नंतर येऊरमध्ये २५ पेक्षा अधिक अनधिकृत हॉटेल्स कम बार, लाऊंज, ढाबे आदीमुले मद्यपींची जत्रा ही रोजची आहे. सोमवारी पालिका आयुक्तांनी ढाबे, हॉटेल्स, लाऊंज अशा ७ अनधिकृत बांधकामावर कारवाई केली. सोबतच कारवाई केलेल्या ठिकाणी पुन्हा हॉटेल्स, ढाबे, उभे राहिल्यास पुन्हा कारवाईचा इशारा दिला आहे. त्यामुळे काही दिवस मद्यपींच्या जत्रेला आता ब्रेक लागलेला आहे.

### आतापर्यंत ३४ ठिकाणच्या हुक्का पार्लर, पब, बारवर कारवाई

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानंतर राज्यभर अनधिकृत बांधकामावर कारवाईचा धडाका सुरु झाला. त्यातच मुख्यमंत्र्यांच्या बाल्लेकिल्ल्यातहि धडक कारवाई सुरु करण्यात आली. चार दिवसात ठाणे महानगर पालिकेच्या परिक्षेत्रात शाळा आणि महविद्यालयापासून १०० मीटरच्या आत असलेल्या एकूण ९८ पानटपऱ्या जप्त तसेच सिल करण्यात आल्या. तसेच, अनधिकृत हुक्का पार्लर, पब, बार अशा मिळून ३४ ठिकाणी पोकलेनच्या सहाय्याने निष्कासन कारवाई करण्यात आली. काही ठिकाणी अनधिकृत, वाढीव शेड हटविण्यात आले.

## रात्रभर मोहीम राबवत नवी मुंबईतील ४१ अनधिकृत हॉटेल, बार, पबवर पालिकेची धडक कारवाई

(सविस्तर वृत्त पान २)



■ कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपासह महायुतीचे उमेदवार ॲड. निरंजन वसंत डावखरे यांनी हॅटट्रिकसह दणदणीत विजयाकडे कूच केली. या विजयाच्या वार्तेनंतर सोमवारी सायंकाळी ठाण्यातील निवासस्थानी भाजपच्या कार्यकर्त्यांनी निरंजन डावखरे यांना उचलून घेत जल्लोष साजरा केला. याप्रसंगी आमदार संजय केळकर, माजी नगरसेवक सुनेश जोशी, मृणाल पेंडसे, परिवहन सदस्य विकास पाटील आदी अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया – मनोज सिंह)

## कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपाचे डावखरेंची हॅटट्रिक



**1,00719 एकूण मते**

**72144 मतांनी विजयी**

ठाणे –विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा निकाल समोर येत आहे. मुंबईतील पदवीधर, शिक्षक, कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक मतदारसंघ अशा चार मतदारसंघात ही निवडणूक झाली होती. कोकण पदवीधर मतदारसंघात भाजपासह महायुतीचे उमेदवार निरंजन वसंत डावखरे यांनी हॅट्ट्रिकसह दणदणीत विजय मिळवून काँग्रेसचे उमेदवार रमेश किर यांचा पराभव केला. पहिल्या फेरीपासून डावखरे यांनी आघाडी घेत तिसऱ्या फेरीअखेर विक्रमी ६२ हजार मताधिक्याची नोंद केली होती. त्यानंतर आमदार निरंजन डावखरे यांना विजयी घोषित करण्यात आले. १,००७१९ मते मिळाली. तर ७२१४४ मतांनी विजयी झाले.

कोकण पदवीधर मतदारसंघात २६ जून रोजी झालेल्या निवडणुकीत १ लाख ४३ हजार २९७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला होता. या निवडणुकीत १३ उमेदवार असले, तरी मुख्य लढत भाजपाचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे व काँग्रेसचे उमेदवार रमेश किर यांच्यात होती. आमदार डावखरे यांना भाजपाबरोबरच महायुतीतील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, (पान २ वर)

### मुंबई पदवीधर मतदारसंघात अनिल परब विजयी



मुंबई पदवीधर निवडणुकीत शिवसेना उबाठा गटाचे उमेदवार अनिल परब आणि भाजपाचे उमेदवार किरण शेलार यांच्यात थेट लढत होती. अनिल पराब यांचा मोठा मताधिक्याने विजय झाल्याची माहिती शिवसनेच्या गोटातून समोर आली. मुंबई पदवीधर मतदारसंघात दीड लाखांच्या आसपास मतदार आहेत. गेली ३० वर्षे शिवसेनेच्या ताब्यात असलेला हा मतदारसंघ कायम ठेवण्याचे ठाकरे गटापुढे मोठे आव्हान होते. यंदा भाजपचे किरण शेलार यांच्यासाठी भाजपने मुंबईतील आपली सर्व यंत्रणा कामाला लावली. मात्र त्यात त्यांना यश मिळू शकले नाही.

### संरक्षण भिंत पडली .... टेरेसच्या पत्रे निखळले.... झाड पडले..व्हॅनचे नुकसान

**सोमवारच्या घटना :**

# ठाण्यात पाऊसाने विश्रांती घेतली असली तरीही पडझडीच्या घटनाना वेग

ठाणे - ठाण्यात पाऊसाने विश्रांती घेतलेली असली तरीही मोठ्या प्रमाणात पडझडीच्या घटना घडताहेत. सोमवारी(ता-१ जुलै) पहाटे पासूनच पडझडीच्या घटना घडलेल्या आहे. झाड पडणे, झाडाच्या फांद्या पडणे, संरक्षण भिंत पडणे, जाहिरातीचा बॅनर पडणे, अशा घटनांनी सोमवार गाजविला असेच चित्र आहे. झाड आणि झाडाच्या फांद्या पडून तीन चारचाकी आणि एक दुचाकीचे नुकसान झाल्याची घटना घडल्या आहेत. या पडझडीत कुठलीही जीवितहानी झालेली नसल्याचे आपत्ती व्यवस्थापन विभागाने माहिती दिली.

सोमवारी सकाळी पहाटे ६-४० वाजण्याच्या सुमारास एकविरा आई मंदिराच्या समोर, ढोकाळी

■ **संरक्षण भिंत कोसळली**

■ **इमारतीच्या टेरेसवरील पत्रे निखळले**

रोड, जवळच असलेल्या श्रुती पार्क आवारात पार्किंग केलेल्या तीन चार चाकी वर मोठे झाड पडल्याने या तिन्ही कारचे नुकसान झाले आहे. क्षतिग्रस्त झालेल्या तीन वाहनांमध्ये ईरटीका, किया सिलॅटोन आणि मारुती सुझुकी ब्रीजा या कारचा समावेश आहे. घटनास्थळी चारचाकी वाहनांवरती पडलेले झाड वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने कापून बाजूला करण्यात आले. तर झाडाची फांदी पडण्याची घटना सोमवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास रौनक पॅराडाईज जवळ, श्री पालाय देवी मंदिराच्या समोर, कोकणी पाडा, उपवन, ठाणे (प.) या ठिकाणी रोड लगत पार्क केलेल्या होंडा एक्टिवा या दुचाकी वाहनावरती झाडाची फांदी पडली. दुचाकी वाहनावरती पडलेली झाडाची फांदी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने कापून बाजूला करण्यात आली. तर सोमवारी दुपारी २-२७ वाजण्याच्या सुमारास पारसिक नगर, ९० फीट रोड, कळवा, ठाणे(प.) या ठिकाणी पार्क केलेल्या हुंडाई आय १० कारचे नुकसान झाल्याची घटना घडली. (पान २ वर)

### जाहिरात होर्डिंग वरील बॅनर लटकलेला

ठाण्याच्या आशार पल्स कंट्रक्शन जवळ, माजिवाडा बस स्टॉपच्या बाजूला, माजिवाडा, ठाणे (प.) या ठिकाणी होर्डिंगला लावण्यात आलेला एक बॅनर लटकत होता. सदर घटनास्थळी मे. पायोनर ॲडव्हर्टायझिंग कंपनीचे कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी घटनास्थळी लटकत असलेला बॅनर मे. पायोनर ॲडव्हर्टायझिंग कंपनीचे कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने बाजूला करण्याचे काम सुरूकरण्यात आले.







## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc.(CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## भंडारा ऑर्डनन्स फॅक्टरी

■ जागा : १५८
■ पदाचे नाव तपशील:
१ कार्यकाळ आधारित DBW (डेंजर बिल्डिंग वर्कर) १५८
■ शैक्षणिक पात्रता: AOCP ट्रेड (NCTVT) चे माजी प्रशिक्षणार्थी ज्यांना ऑर्डनन्स फॅक्टरी प्रशिक्षण / लष्करी दारूगोळा आणि स्फोटकांच्या निर्मिती आणि हाताळणीचा अनुभव आहे. आणि पूर्वीच्या आयुध निर्माणी मंडळाच्या आयुध कारखान्यांमध्ये प्रशिक्षण घेतलेले AOCP ट्रेडचे एक्स-ट्रेड अप्रेंटिस. किंवा NCTVT (आता NCVT) द्वारे जारी केलेले NAC/NTC प्रमाणपत्र असलेले उमेदवार आणि सरकारशी संलग्न असलेल्या सरकारी/खाजगी संस्थेकडून AOCP ट्रेडमध्ये आणि सरकारी ITI मधून AOCP असलेले उमेदवार विचारात घेतले जातील.
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १८ ते ३५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: भंडारा
■ फी : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Chief General Manager, Ordnance Factory Bhandara District: Bhandara Maharashtra, Pin-441906
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाइट https://ddpdoo.gov.in/units/OFBA

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM²)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

■ Total: ५६
■ पदाचे नाव तपशील:
ज्युनियर मॅनेजर माइनिंग
इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR
■ शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोलकाता
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४
■ वेबसाईट https://www.hindustancopper.com/

## बँक ऑफ बडोदा

■ जाहिरात क्र.: BOB/HRM/REC/ -DVT/२०२४/०४ BOB/HRM/REC/-DVT/2024/05
■ पदाचे नाव तपशील:
BOB/ HRM/REC/ ADVT/२०२४/०४ १ Regular Posts (मॅनेजर आणि इतर पदे) ४५९
BOB/ HRM/REC/ -DVT/२०२४/०५ २ Contract Posts (मॅनेजर आणि इतर पदे) १६८
■ शैक्षणिक पात्रता: (i) CA/CMA/CS/CF-/कोणत्याही शाखेतील पदवी/ इ.Tech/ B.E./ M.Tech/ M.E./MCA (ii) अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ३०/३५/३८/४०/४२/४५ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 600/- SC/ST/PWD/महिला: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०२ जुलै २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ वेबसाईट https://www.bankofbaroda.in/

## कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट मॅनेजर (Legal)
२ असिस्टंट मॅनेजर (Official Language)
३ मॅनेजमेंट ट्रेनी (Mktg)
४ मॅनेजमेंट ट्रेनी (Accounts)
५ ज्युनियर कमर्शियल एक्झिक्युटिव
६ ज्युनियर असिस्टंट (General)
७ ज्युनियर असिस्टंट (Accounts)
८ ज्युनियर असिस्टंट (Hindi Translator )
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.२: (i) ५०% गुणांसह हिंदी विषयात पदव्युत्तर पदवी (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.३: MB- (Agri Business Management/ Agriculture)
पद क्र.४: CA/ CMA
पद क्र.५: ५०% गुणांसह B.Sc (Agriculture) SC/ST/PWD:४५% गुण
पद क्र.६: ५०% गुणांसह B.Sc (Agriculture) SC/ST/PWD:४५% गुण
पद क्र.७: ५०% गुणांसह B.Com
पद क्र.८: इंग्रजी विषयासह हिंदी विषयात पदवी.
■ वयाची अट: १२ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ २: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.३ ते ८: १८ ते ३० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १५००/- SC/ST/PWD/ExSM²: ५००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०२ जुलै २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट: https://cotcorp.org.in/?-spx-

## वाईट सवयींचा परिणाम यकृतावर



हल्ली यकृताचे विकार होण्याचे प्रमाण दिसून येत आहे. यासाठी कारण आहे म्हणजे जीवनशैलीतील बदल. आहार विहारातील बदलाचाही मोठा परिणाम होतो. दीर्घकाळ शरीरात दिसून येणारे बदल नजरेआड करणे, या सर्वांमुळे यकृताशी निगडित त्रास वाढतात. सुमारे पाचशेहून अधिक क्रियांमध्ये यकृताची भूमिका फार महत्त्वाची असते. शरीराची चयापचयक्रिया योग्य राखण्याचे कामही यकृत करत असते. आपण खाल्लेले अन्न पचवून त्यापासून उर्जेची निर्मिती करणे आणि शरीरातील वाईट पदार्थ काढून टाकण्याचे कामही यकृत करते. रक्त हे शरीराचा आरसा आहे असे म्हटले जाते. रक्त स्वच्छ राखण्यातही यकृताचे कार्य महत्त्वाचे असते. रक्तातील टाकाऊ पदार्थ गाळण्याचे काम यकृतालाच करायचे असते. त्यामुळेच यकृताचे काम बिघडू नये, यासाठीच प्रयत्न करायला हवे. कारण, यकृताचे काम बिघडले, तर अनेक प्रकारांचे विकार शरीरात घर करू शकतात.

यकृताचे आरोग्य खूप बिघडले तर यकृताची दुरुस्ती करणे सोपी गोष्ट नाही. वेगवान झालेल्या आयुष्यात शरीर दर्शवत असलेल्या लक्षणांकडे आपले लक्ष नसते. अर्थात विविध विकारांची लक्षणे निरनिराळी असतात. मात्र, यकृताच्या काही रोगांमध्ये दिसणारी काही सर्वसामान्य लक्षणे आहेत. जसे त्वचा, डोळे पिवळे पडणे, पोट किंवा पायाच्या घोट्याला सूज येणे, उलटी होणे, भूक कमी लागणे, सतत चक्कर येणे, खाज जाणवणे, लघवी अतिपिवळी होणे, शौचाला रक्तपडणे.

### हेपेटायटिस किंवा कावीळ

यकृताशी निगडित सर्वात मोठी समस्या म्हणजे हेपेटायटिस. यकृतामध्ये विषाणू संसर्ग झाल्याने कावीळ होते. त्यामुळे यकृताला सूज येते. हा संसर्ग वाढला तर यकृत पूर्णपणे खराब होते. हेपेटायटिस किंवा कावीळ पाच प्रकारांची असते. हेपेटायटिस ए, बी, सी, डी आणि ई. हेपेटायटिस ए आणि ई हे हेपेटायटिस चे प्रकार दूषित पाणी आणि दूषित अन्न यांच्या सेवनाने होतात. मुले आणि वृद्ध लोक यांच्यामध्ये ही कावीळ होण्याचे प्रमाण अधिक असते. खूप गर्दीच्या ठिकाणी जिथे स्वच्छतेची फारशी काळजी घेतली जात नाही, अशा ठिकाणी या हेपेटायटिस संसर्गाचा प्रभाव अधिक दिसून येतो. तर हेपेटायटिस बी, सी आणि डी हे संक्रमित व्यक्तीच्या रक्त किंवा इतर द्रव्य पदार्थांच्या संपर्कात आल्याने होते. हेपेटायटिस ए आणि सी यांचा संसर्ग हा गंभीर असल्याचे मानले जाते. हा संसर्ग पुढे जाऊन लिव्हर सिरोसिस आणि कर्करोग होण्यासही कारण ठरते. हेपेटायटिस टाईप ए आणि बी यापासून बचाव करण्यासाठी लस उपलब्ध आहे. तर हेपेटायटिस सी आणि ई यांच्यासाठी मात्र काहीही लस उपलब्ध नाही.

### लिव्हर सिरोसिस

हा विकार निश्र्चितच गंभीर आहे. कारण, यामध्ये यकृताला कायमस्वरूपी इजा होऊ शकते. यकृत आकुंचन पावते आणि कडक होते. लिव्हर सिरोसिसमध्ये यकृताच्या पेशी नष्ट होतात त्यांची जागा तंतुमय घटक घेतात. आहाराच्या चुकीच्या सवयी, अतिमद्यपान यामुळे ही समस्या निर्माण होऊ शकते. जास्त चरबीयुक्त पदार्थ, मांसाहारी पदार्थ सेवन केल्याने ही समस्या निर्माण होऊ शकते. रक्तातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते आणि काही विशिष्ट औषधांमुळेही ही समस्या निर्माण होते. यकृताला झालेला हा संसर्ग प्रमाणाबाहेर वाढल्यास केवळ लिव्हर ट्रान्सप्लांट हा एकच उपाय करता येतो.


### यकृताचा कर्करोग

यकृताच्या कर्करोगात यकृताच्या पेशी नष्ट होतात. यकृताचा कर्करोग दोन प्रकारांचा असतो. पहिला यकृताच्या पेशीपासून सुरू होतो, तर दुसर्या प्रकारात कर्करोग दुसर्या अवयवांपासून सुरू होऊन यकृतापर्यंत पोहोचतो. लिव्हर सिरोसिस, फॅटी लिव्हर किंवा काविळीचे प्रमाण वाढले तरीही यकृताचा कर्करोग होऊ शकतो. विस्तृत तपासण्यांनंतर कर्करोगावर रेडिएशन, किमोथेरेपी, शस्त्रक्रिया आदी उपचार केले जातात. गंभीर प्रकरणांमध्ये ट्रान्सप्लांटही केले जाऊ शकते.

### फॅटी लिव्हर

यकृताच्या पेशींमध्ये चरबी जमा झाल्यास फॅटी लिव्हरची समस्या निर्माण होते. गरजेपेक्षा जास्त चरबी जमा झाल्याने यकृताच्या पेशी कडक होतात. फॅटी लिव्हरशी निगडित समस्या या दोन प्रकारांच्या असतात. अतिमद्यपानामुळे होणारा फॅटी लिव्हर हा आजाराचा एक प्रकार तर दुसरा नॉन अल्कोहोलिक म्हणजे मद्यपान न करताही होणारा विकार. अर्थात या विकाराची लक्षणे स्पष्टपणे दिसत नाहीत. पण, काही व्यक्तींना खूप जास्त थकवा आणि यकृताचा आकार वाढत असल्याचेही दिसून येते. स्थूलता, मधुमेह टाईप टू या विकारांनी ग्रस्त रूग्णांमध्ये हा विकार होण्याची शक्यता अधिक असते. ॲस्प्रिन, स्टिरॉईडचे अतिसेवन केल्यासही हा त्रास होतो.

# महिला संघाची द. आफ्रिकेवर मात



## स्नेह राणाने १० विकेट्स घेत केला मोठा पराक्रम

चेन्नई : भारतीय महिला क्रिकेट संघ आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी सामना आज पार पडला. चार दिवस चाललेल्या या सामन्यात टीम इंडियाने १० गडी राखून विजय मिळवला. टीम इंडियाला दुसऱ्या डावात फक्त ३७ धावांची गरज होती, जी त्याने एकही विकेट न गमावता पूर्ण केले. भारताने हे लक्ष्य १०व्या षटकातच गाठले आणि मालिका जिंकली. या सामन्यात भारतीय महिला संघाच्या फलंदाजांनी चमकदार कामगिरी केली असली तरी गोलंदाज स्नेह राणाने दाखवलेला खेळ वाखाणण्याजोगा होता. या सामन्यात तिने १० विकेट्स घेत इतिहास रचला आहे.

सामन्याच्या पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या फलंदाजांना स्नेह राणासमोर तग धरता आला नाही. राणाने २५.३ षटकं गोलंदाजी करताना ७७ धावांत ८ बळी घेतले. यापैकी तिने चार षटके अशा प्रकारे टाकली की एकही धाव दिली नाही. पहिल्याच डावात तिने आठ विकेट घेतल्यावर या सामन्यात ती किमान दहा विकेट्स घेऊ शकते हे जवळपास निश्चित झाले होते. दक्षिण आफ्रिकेला फॉलोऑन मिळाला, त्यामुळे त्यांना लगेचच फलंदाजीला यावे लागले.

दुसऱ्या डावात स्नेह राणाने ४० षटके गोलंदाजी करताना १२ षटकं निर्धाव टाकली आणि १११ धावा दिल्या आणि दोन गडी बाद केले. यासह तिच्या १० विकेट्स पूर्ण झाल्या. दुसऱ्या डावात स्नेह राणाच्या दोन विकेट्सशिवाय दीप्ती शर्मा आणि राजेश्वरी गायकवाड यांनीही प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. पूजा वस्त्राकर, शफाली वर्मा आणि कर्णधार हरमनप्रीत कौर यांनीही प्रत्येकी एक विकेट घेतली. स्नेह राणा व्यतिरिक्त झुलन गोस्वामी ही एकमेव भारतीय गोलंदाज आहे जिने एका कसोटी सामन्यात १० विकेट्स घेतल्या आहेत.

सामन्याबद्दल बोलायचे झाले तर भारताने प्रथम फलंदाजी करताना ६ विकेट्सवर ६०३ धावा करून डाव घोषित केला. यामध्ये शफाली वर्माचे द्विशतक आणि स्मृती मानधनाच्या शतकी खेळीचा समावेश आहे. तर जेमिमाह रॉड्रिग्स, हरमनप्रीत कौर आणि रिचा घोष यांनी अर्धशतके झळकावली. या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संपूर्ण संघ २६६ धावांवरच मर्यादित राहिला, त्यामुळे त्यांना फॉलोऑनला सामोरे जावे लागले. यानंतर दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात ३७३ धावा केल्या. म्हणजेच भारताला केवळ ३७ धावांचे लक्ष्य मिळाले, जे त्याने एकही विकेट न गमावता पूर्ण केले आणि सामना दहा गडी राखून जिंकला.



# भारतीय रिअल इस्टेट रिअल इस्टेटमधील भावना वाढवणाऱ्या अर्थसंकल्पासाठी उत्सुक : जितेंद्र मेहता



ठाणे : अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते सादर होणारा आगामी केंद्रीय अर्थसंकल्प भारत सरकारच्या 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमाला गती देण्याची एक आदर्श संधी आहे, असे CREDAI MCHI चे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी सांगितले. ठाणे. भारतीय रिअल इस्टेट क्षेत्र - आणि ठाण्यातील रिअल इस्टेट - गृहखरेदीदार आणि रिअल इस्टेट डेव्हलपर्स या दोघांच्याही परिस्थितीला चालना देणाऱ्या उपायांची अपेक्षा आहे, ते पुढे म्हणाले. १: जीएसटी बंद पुनर्विकास, २: पुनर्विकासात दिलेले मोफत फ्लॅटचे काल्पनिक मूल्य आणि त्यावर कर आकारणी हे मुद्दे ठाणे रिअल इस्टेटला या अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी सोडवण्याची अपेक्षा आहे, असे जितेंद्र मेहता यांनी सांगितले. CREDAI MCHI ठाणे अध्यक्ष म्हणाले, अर्थव्यवस्थेला थेट चालना देणाऱ्या उपायांव्यतिरिक्त, आम्ही गृहनिर्माण क्षेत्रातील भावना सुधारेल अशा धोरणात्मक उपक्रमांचा अर्थसंकल्प सादर करण्याची अपेक्षा करतो. रस्ते आणि सार्वजनिक वाहतूक जसे की रस्ते, मेट्रो, जलमार्ग, बोगदे आणि रेल्वे यासारख्या पायाभूत सुविधांचा विकास केल्याने महानगर क्षेत्रांचा विस्तार होण्यास मदत होते आणि परवडणाऱ्या घरांना चालना मिळते. ठाणे हे एक शहर आहे ज्याला पायाभूत सुविधांच्या वाढीचा फायदा झाला आहे आणि शहर केंद्रीय अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना अधिक चालना देण्यासाठी उत्सुक आहे, त्यांनी निष्कर्ष काढला.



महाराष्ट्रातील हरितक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांच्या जयंतीनिमित्त ठाणे जिल्हा परिषदेतील अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, कृषी विकास अधिकारी रामेश्वर पाचे, स्वच्छता व पाणी पुरवठा विभाग प्रमुख अतुल पारसकर, पशुसंवर्धन विभाग प्रमुख डॉ. समीर तोडणकर, जिल्हा जलसंधारण अधिकारी दिलीप जोकार तसेच अधिकारी व कर्मचारी कार्यक्रमात उपस्थित होते.



माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक जयंती निमित्ताने पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात आज(१जुलै ) त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते,लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनी त्यांचे प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर, प्र.उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर व महापालिकेच्या विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.




हरितक्रांती व श्वेतक्रांतीचे जनक, नामांकित कृषीतज्ज्ञ, महाराष्ट्र राज्याचे १२ वर्षे मुख्यमंत्रीपद भूषविणारे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे अतिरिक्त आयुक्तसुनिल पवार यांच्या हस्ते प्रतिमापूजन संपन्न झाले. याप्रसंगी उपआयुक्तकिसनराव पलांडे, प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, विलास मलुष्टे, रवी जाधव, संजीव पवार आणि इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री हरित ठाणे अभियानात एक लाख झाडे लावणार

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली ग्वाही

■ कुलगुरू रवींद्र कुलकर्णी आणि सौरभ राव यांनी केले उपकेंद्रात वृक्षारोपण

■ १९९ शाळा आणि ०५ महाविद्यालयांनी काढल्या वृक्ष दिंडी

■ स्थानिक लोकप्रतिनिधींनी घेतला सहभाग

■ कृषी दिनानिमित्त ठाण्यात वृक्षारोपण आणि वृक्ष दिंडींचे आयोजन



ठाणे (गणेश भोईटे) : मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'मुख्यमंत्री हरित ठाणे अभियानात' आतापर्यंत २७,३३७ झाडे लावण्यात आली असून एक लाख झाडे लावण्याचे लक्ष्य महापालिका १५ ऑगस्टपूर्वी पूर्ण करणार असल्याची ग्वाही ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे. 'मुख्यमंत्री हरित ठाणे अभियानात', कृषी दिनाचे औचित्य साधून सोमवारी सकाळी बाळकूम येथील मुंबई विद्यापीठाच्या धर्मवीर आनंद दिघे उपकेंद्र परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

■ सदर वृक्षारोपणाची सुरवात ही महाराष्ट्राचे राज्यफूल असलेल्या 'ताम्हण' या झाडाच्या रोपणाने करण्यात आली. याप्रसंगी ताम्हण या वृक्षाचे वैशिष्ट्य व महत्त्व वृक्ष प्राधिकरणाचे वृक्षाधिकारी केदार पाटील यांनी सांगितले. या परिसरात एकूण ३०० झाडे लावण्यात आली. त्यात, ताम्हणसोबतच, बकुळ, जांभूळ, कडुनिंब, कांचन, बेहडा, महोगनी, बांबू आदींचा समावेश आहे. जोशी-बेडेकर महाविद्यालय आणि देवराम लक्ष्मण भोईर पदवी महाविद्यालय यांच्या एनएसएस आणि एनसीसीचे विद्यार्थी उपकेंद्र परिसरातील वृक्षारोपण मोहिमेत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत, रोटरी क्लबच्या सदस्यांनीही वृक्षारोपण केले.

■ कृषी दिनाच्या औचित्याने आज मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्रात वृक्षारोपण करण्याची संधी मिळणे हे भाग्याचे आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या सहभागातून येत्या १५ ऑगस्टपर्यंत एक लाख झाडे लावण्याचा संकल्प पूर्ण करण्यात येणार आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या या हरित ठाणे अभियानास लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे प्रतिपादन याप्रसंगी आयुक्त राव यांनी केले.

या समारंभात, महापालिका आयुक्त सौरभ राव, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी, माजी स्थायी समिती सभापती संजय भोईर, माजी नगरसेविका उषा भोईर, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, उपायुक्त (उद्यान) सचिन पवार, उपायुक्त (परिमंडळ ३) दिनेश तायडे, सहाय्यक आयुक्त प्रितम पाटील, उपकेंद्रांचे संचालक अद्वैत वैद्य, जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक आदी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उपकेंद्राच्या परिसराचे रुपडे पालटून टाकण्याची गरज असून त्यासाठी मुंबई विद्यापीठाने पुढाकार घ्यावा. त्यांना महापालिका सर्वतोपरी मदत करेल, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. या बदलांसाठी सर्वंकष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात यावे. त्यासाठी महापालिका मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री देईल. त्यात परिसरातील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचाही श्रमदानाच्या माध्यमातून सहभाग घ्यावा. म्हणजे त्यांच्यात स्वच्छतेचे संस्कार रुजतील, असेही आयुक्त राव यांनी सांगितले. याप्रसंगी, मुख्यमंत्री हरित ठाणे या अभियानाचे कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांनी स्वागत केले. तसेच, उप केंद्र परिसरातील उपक्रमांची माहिती दिली.

### अभियानात आतापर्यंत २७,३३७ झाडे लावली

ठाणे महापालिकेने ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिना'च्या निमित्ताने महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी कॅडबरी नाका येथे वृक्षारोपण करून 'मुख्यमंत्री हरित ठाणे अभियाना'ची सुरवात करण्यात आली. महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय तसेच खाजगी जागांवर १५ ऑगस्टपर्यंत एक लक्ष स्थानिक प्रजाती, विशेषतः बांबू लागवड करण्याचा महापालिकेचा संकल्प आहे. या अभियानाअंतर्गत आतापर्यंत २७,३३७ झाडे लावण्यात आली आहेत. उर्वरित झाडांच्या रोपणाचे नियोजन करण्यात आले आहे. जागेच्या उपलब्धतेनुसार ही झाडे लावली जात आहेत.

### २०४ शाळा- महाविद्यालयातून निघाल्या वृक्षदिंडी

दरम्यान, कृषी दिनाचे औचित्य साधून 'मुख्यमंत्री हरित ठाणे अभियाना'चा संदेश घरोघरी नेण्यासाठी ठाणे महापालिकेच्या शाळा आणि खाजगी शाळा यांच्या विद्यार्थ्यांच्या सहभागाने शाळांच्या परिरसात छोटेखानी वृक्षदिंड्यांचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील १२९ म.न.पा. शाळा, ७० खाजगी शाळा व ०५ महाविद्यालये अशा एकूण २०४ शाळा व महाविद्यालयातील सुमारे २५०० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन आपआपल्या परिसरामध्ये वृक्ष दिंडी आणि वृक्षारोपण केले. त्यांनी ५४०० वृक्षरोपांची लागवड केली. विविध ठिकाणी झालेल्या वृक्षारोपण कार्यक्रमात विद्यार्थी आणि शिक्षकांसह महापालिकेच्या उपायुक्त (पर्यावरण) अनघा कदम आणि मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान सहभागी झाले होते.

# 'स्वच्छता अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानाचा उत्साहात प्रारंभ




नवी मुंबई : स्वच्छता आणि आरोग्य यांचा परस्पर संबंध असून आपल्या घराप्रमाणेच आपला परिसरही स्वच्छ राहील याची आपण खबरदारी घेतली पाहिजे. विशेषत्वाने पावसाळी कालावधीत आपल्या आरोग्याच्या दृष्टीने पाणी उकळून व गाळून पिणे, घरातूनच कचऱ्याचे ओला व सुका वर्गीकरण करुन घंटागाडीत वेगवेगळा देणे आणि परिसर स्वच्छ राखणे या त्रिसूत्रीचा अवलंब केला पाहिजे अशा शब्दात नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी उपस्थितांशी सुसंवाद साधला.

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' च्या अनुषंगाने 'स्वच्छता अपनाओ - बिमारी भगाओ' अभियानाचा शुभारंभ वाशी येथील नमुंमपा सार्वजनिक रुग्णालयात महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. या प्रसंगी ते मनोगत व्यक्त करीत होते.

पावसाळी कालावधीत डासांमुळे मलेरिया व डेंग्यू सारखे आजार होतात. त्यामुळे डास उत्पत्ती रोखण्यासाठी आपण पाणी साचून डास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे दूषित पाण्यामुळे होणारे अतिसारासारखे आजार रोखण्यासाठी शुध्द पाणी पिण्याची आवश्यक खबरदारी घेतली पाहिजे. यादृष्टीने केंद्र सरकार मार्फत जाहीर करण्यात आलेले 'स्वच्छता अपनाओ - बिमारी भगाओ' हे अभियान आपल्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे असून त्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमात नागरिकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे असेही आवाहन आयुक्तांनी केले.

याप्रसंगी बोलताना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी नवी मुंबई महानगरपालिका शहर स्वच्छतेसाठी व आरोग्यासाठी कटिबध्द असल्याचे सांगत नागरिकांनी याकामी सक्रीय सहभागी व्हावे असे सांगितले.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांनी महानगरपालिकेने जून महिन्यातच पावसाळी आजारांच्या अनुषंगाने नागरी आरोग्य केंद्रांमार्फत सर्वेक्षण करण्यात आल्याची माहिती दिली व 'स्वच्छता अपनाओ - बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत आरोग्य विषयक व्यापक प्रमाणात जनजागृती केली जाईल असे सांगितले.

आजच्या डॉक्टर्स दिनाचे औचित्य साधून नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या शुभहस्ते वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, उपआयुक्त डॉ. अजय गडदे, वैद्यकीय अधिक्षक डॉ. राजेश म्हात्रे व डॉ. उध्दव खिल्लारे तसेच इतर डॉक्टर्सना गुलाब पुष्प

# घोडबंदरचा 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्यासाठी रहिवाशांची एकजूट

**ठाणे : ठाणे ते बोरिवली या भुयारी मार्गाच्या प्रकल्पासाठी घोडबंदर येथील कासारवडवली भागातील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ सिमेंट काँक्रीट तयार करण्यासाठीचा (आरएमसी) प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषण आणि धुळीचे साम्राज्य पसरत आहे. त्यामुळे येथील रहिवासी संतप्त झाले असून रविवारी येथील नागरिकांनी 'आरएमसी' प्रकल्प बंद करण्याची मागणी करत आंदोलन केले. या आंदोलनात पर्यावरणवादी सहभागी झाले होते.**

ठाणे आणि मुंबईकरांच्या प्रवासाचा खर्च आणि वेळेची बचत व्हावी, यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून ठाणे ते बोरिवली असा भुयारी मार्ग उभारण्यात येत आहे. या कामाकरिता कासारवडवली येथे हावरे सिटी गृहसंकुलाला लागूनच 'आरएमसी' प्रकल्प सुरू आहे. तसेच संजय गांधी उद्यानाजवळ हा प्रकल्प आहे. या आरएमसी प्रकल्पाचा सर्वाधिक परिणाम हावरे सिटी गृहसंकुलातील रहिवाशांना सहन करावा लागत आहे.

या गृहसंकुलात ३० हून अधिक इमारती आहेत. तसेच येथे आठ हजारहून अधिक रहिवाशी राहतात. परिसरात एक शाळा देखील आहे. आरएमसी प्रकल्पात दिवस रात्र कामे सुरू असतात. त्यामुळे रात्री ध्वनी प्रदुषण होत असून रहिवाशांची झोपमोड होऊ लागली आहे. ज्येष्ठ नागरिकांना दमा, श्वासोच्छवासाच्या समस्यांचा धोका निर्माण झाला आहे. आरएमसी प्रकल्पात दररोज शेकडो डम्पर राडारोडा घेऊन जात असतात. त्यामुळे धुळीचे साम्राज्य पसरत आहे. याशिवाय, या प्रकल्पापासून काही अंतरावर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान असून आवाजाचा त्रास वन्यजीवांवर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# नेरुळ रेल्वे स्टेशन परिसराची लोकसहभागातून स्वच्छता




नवी मुंबई : 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' च्या अनुषंगाने 'स्वच्छता अपनाओ - बिमारी भगाओ' अभियान नागरिकांच्या सहभागातमन संपूर्ण नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात राबविण्यात येत आहे. त्यानुसार आज नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचय मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त् श्री. सुनिल पवार व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली नेरुळ रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेकडील परिसरात सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेत नेरुळ विभागाचे सहा.आयुकत तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे यांनी विभागातील अधिकारी, कर्मचारीवृंद व स्वच्छता मित्रांसह सक्रीय सहभागी होत स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या पार पाडली. यामध्ये महाविद्यालयीन एनएसएस विदयार्थी, ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य, स्थानिक रीक्षा ड्रायव्हर तसेच नागरिक मोठया संख्येने सहभागी झाले होते. प्लास्टिक बॉटल्स, रॅपर्स, प्लास्टिक, थर्माकोल व कागदाचे तुकडे अशा प्रकारचा कचरा जमा करुन नेरुळ रेल्वे स्टेशनचा परिसर साफ करण्यात आला. यामध्ये एकूण ५० गोणी कचरा जमा करण्यात आला.

## मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आयुक्त यांच्या निर्देशानुसार

# गुटखा, तंबाखू विक्री करणाऱ्या एकूण 30 स्टॉल धारकांवर धडक कारवाई

भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार शाळा, कॉलेज, मंदिर यांच्यापासून शंभर मीटर परिसरामध्ये जे स्टॉलधारक सिगारेट, तंबाखू, गुटखा याची विक्री करतात अशा एकूण ३० स्टॉल धारकांवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत धडक कारवाई करण्यात आली. मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी विविध प्रभागातील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करणेकामी निर्देशित करण्याच्या सूचना दिल्या आहे. त्या निर्देशानुसार प्रभागातील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत सीसीटीव्ही यंत्रणा स्मार्टपोल, फेरीवाले, गॅरेजेस, पदपथावरील व्यावसायिक, अनधिकृत हॉटेल/बार, अनधिकृत होर्डिंग्ज, अनधिकृत झोपड्या यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे.

आयुक्त यांच्या सुचनांनुसार मिरा भाईंदर महानगरपालिका अतिक्रमण विभागाने महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे, अनधिकृत स्टॉलधारक यांच्यावर कठोर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. मिरा भाईंदर वसई विरार पोलीस प्रशासनाने मिरा भाईंदर महानगरपालिकेस पत्रव्यवहार केल्यानंतर गुटखा बंदी या कायद्या अंतर्गत





महापालिका व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ही धडक कारवाई करण्यात आली. प्रभाग समिती क्रमांक ०४ मध्ये १८ टपऱ्या, प्रभाग समिती क्रमांक ०६ मध्ये ८ टपऱ्या, प्रभाग समिती क्रमांक ०१ मध्ये ३ टपऱ्या व प्रभाग समिती क्रमांक ०२ मध्ये एक अश्या एकूण ३० टपऱ्यांवर महापालिकेमार्फत कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाई प्रसंगी अतिरिक्त आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (अतिक्रमण) रवि पवार, पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड, सहाय्यक आयुक्त, कनिष्ठ अभियंता, फेरीवाला पथकप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१